**परीक्षा प्राधान्य :** जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/GCC-SSD-CTC/अधिसू/जून२०२५/४६३

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४
दिनांक :- ०५/०२/२०२५.

**प्रति,**

**संस्थाचालक,**
**सर्व शासनमान्य संगणक टायपिंग संस्था,**
**महाराष्ट्र राज्य व गोवा राज्य.**

**विषय :- स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर स्टुडन्टस् ॲण्ड इन्स्ट्रक्टर्स(GCC-SSD-CTC) जून -२०२५अधिसूचना व ऑनलाईन आवेदनपत्र स्वीकृती कार्यक्रम.**

**संदर्भ :- टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक टायपिंग अभ्यासक्रम मान्यता व संचालन नियम १९९१ सुधारित नियमावली २०२३ दि. २७/०४/२०२३.**

राज्यातील शासन मान्यताप्राप्त संगणक टायपिंग संस्थांमधील नियमित विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत जून - २०२५ मध्ये स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर स्टुडन्टस् ॲण्ड इन्स्ट्रक्टर्स(GCC-SSD-CTC) ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांकडून त्यांच्या संगणक टायपिंग संस्थेमार्फत आवेदनपत्रे ऑनलाईन मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | जिल्हयांची नावे | परीक्षेचे ठिकाण |
|---|---|---|
| १. | मुंबई (उ/द/प) रायगड, ठाणे, पालघर | ठाणे |
| २ | पुणे, अहमदनगर | पुणे |
| ३. | नाशिक, धुळे, जळगांव, नंदुरबार | धुळे |
| ४. | कोल्हापूर, सातारा, सांगली, सिंधुदुर्ग, रत्नागिरी | कोल्हापूर |
| ५. | संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, हिंगोली | जालना |
| ६. | अमरावती, बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ | अकोला |
| ७. | नागपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली | नागपूर |
| ८. | लातूर, उस्मानाबाद, नांदेड, सोलापूर | लातूर |

**वरील तक्त्यात नमूद केलेल्या जिल्हयांची परीक्षा नमूद ठिकाणीच घेण्यात येणार आहे तसेच त्यामध्ये कोणताही बदल केला जाणार नाही याची सर्व संस्थाचालकांनी नोंद घ्यावी.**

व्दितीय सत्र - जानेवारी - २०२५ ते मार्च - २०२५ या सत्रासाठी प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना या परीक्षेसाठी विहित पूर्वअटी पूर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे जून - २०२५ मध्ये होणाऱ्या स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर स्टुडन्टस् ॲण्ड इन्स्ट्रक्टर्स (GCC-SSD-CTC) परीक्षेसाठी भरता येतील.

**अ) परीक्षेस पात्र होण्यासाठीचे निकष :-**

१. उमेदवार शासनमान्य शाळेतून **किमान १० वी उत्तीर्ण** असावा.
२. शासनमान्य संगणक टायपिंग संस्थेत नियमित विद्यार्थी म्हणून प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे.

